# Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेस नोट ता. १६/०७/२०२०

## अवैध अग्निशस्त्रांची तस्करी करणाया मध्य प्रदेश व महाराष्ट्रातील २६ आरोपींच्या आंतरराज्य टोळीचा गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी-चिंचवड कडुन पर्दाफाश

### ७५ पिस्टल/गावठी कट्टे महाराष्ट्रात विक्री केल्याचे उघड, १५ आरोपी अटक व एकुण १९,८९,५००/- रु किं चे ४२ पिस्टल/गावठी कट्टे व ६६ जिवंत काडतुसे जप्त

दि. ०६/०३/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट-४ येथे नेमणुकीस असलेले **पोलीस नाईक लक्ष्मण आढारी** यांना मिळालेल्या बातमी नुसार आरोपी नामे गणेश माळी, रा- सांगवी यास अवैध अग्निशस्त्रासह अटक करुन त्याचे विरुद्ध वाकड पोलीस ठाणे येथे गु.र.नंबर- २०१/२०२० भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,(२५) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याने सदरचे अग्निशस्त्रे हे ग्यानोबा उर्फ गोटु मारुती गिते, रा- परळी, जि- बीड याचे कडुन घेतल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास या गुन्हयात अटक करण्यात येवुन त्यावेळी त्यादोघांकडुन एकुण ०६ पिस्टल/गावठी कट्टे व १५ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले होते. त्यावेळी केलेल्या तपासात गोटु गिते याने मध्य प्रदेश येथिल धार जिल्हयातील सरदार नावाच्या व्यक्ती कडुन शस्त्रे आणल्याचे सांगितले होते. त्यावेळी मार्च महिन्यात एक पथक मध्य प्रदेश येथे जावुन आरोपीचा शोध घेण्यात आला परंतु तो मिळुन आला नव्हता. कोरोना विषाणुच्या संकटामुळे देशाभरात लॉकडाऊन सुरू झाल्याने त्यावेळी तपासावर मर्यादा आल्या होत्या.

तपासासाठी गेलेल्या पथकाने आरोपी संदर्भात काढलेल्या माहितीच्या अनुशंगाने लॉकडाऊनच्या कालावधीत गुन्हे शाखा युनिट-४ चे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व पोलीस शिपाई प्रशांत सैद** यांनी मध्य प्रदेश येथिल आरोपींच्या अनुशंगाने बारकाईने तांत्रिक विश्लेषन करुन एका पथकास मध्य प्रदेश येथे पाठवले. सदर पथकाने त्याठिकाणी जावुन वेशांतर करुन आरोपींन बाबत व त्यांचे शस्त्रांचे खरेदी विक्रीचे व्यवहाराबाबत सविस्तर अभ्यास केला. सदर अग्निशस्त्रांचे प्रकरण हे अतिशय गंभीर असल्याचे लक्षात आल्याने लॉकडाऊन शिथील होताच याबाबत मा. सुधिर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त(गुन्हे) व मा. राजाराम पाटील, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्याशी चर्चा करुन मध्य प्रदेशातील शस्त्रे पुरवणाया मुख्य आरोपीस ताब्यात घेण्याच्या अनुशंगाने चर्चा करुन ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला. त्यानुसार वपोनि शिंदे गुन्हे शाखा युनिट-४ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि देशमुख व पथक हे सदर ठिकाणी आरोपी पकडते वेळी प्रतिहल्ला होण्याची शक्यता लक्षात घेवुन संपुर्ण तयारीनिशी ग्राम-सिंघाना, थाना-मनावर, जि-धार, मध्य प्रदेश येथे रवाना झाले. सदर पथकाने त्याठिकाणी जावुन २ दिवस तळ ठोकुन वेशांतर करुन त्याभागातुन मुख्य **आरोपी नामे मनिसिंग गुरमुख सिंग भाटीया यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुनही शिताफीने ताब्यात घेतले व त्याचे कडुन ११ गावठी पिस्टल व २२ जिवंत काडतुसे जप्त केली.**

सदर आरोपीकडे केलेल्या तपासा दरम्यान त्याने व त्याचा साथीदार नामे कालुसिंग जसवंत सिंग, रा- ग्राम-सिंघाना, थाना-मनावर, जि-धार, मध्य प्रदेश याने महाराष्ट्रातील **१) कुश नंदकुमार पवार रा- तळेगाव दाभाडे व प्रसन्न ज्ञानेश्वर पवार रा- गोडुंब्रे (शिरगाव) २) आकाश उर्फ बाळा जगन्नाथ वाघमोडे रा- कुर्डुवाडी जि.सोलापुर व योगेश विठ्ठल कांबळे, रा-परांडा, जि. उस्मानाबाद ३) गोटु उर्फ ग्यानोबा मारुती गिते, रा- परळी, जि. बीड** या टोळी प्रमुखांना मोठया प्रमाणात अग्निशस्त्रे विकल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तातडीने वेगवेगळी पथके तयार करुन वरील आरोपींना अटक करण्यात आली.

सदर आरोपींना अटक केल्यानंतर **कुश पवार व प्रसन्न पवार** या टोळी प्रमुखाने मध्य प्रदेश येथुन **एकुण २९ पिस्टल/गावठी कट्टे** आणुन ते खालील आरोपींना विकल्याचे निष्पन्न झाले. यात काही मोक्का खाली अटक असणाया आरोपींचाही समावेश आहे.

१) कुश नंदकुमार पवार, रा- श्रद्धा अपार्टमेंट, तळ मजला, शाळा चौक, तळेगाव दाभाडे, पुणे- **०७** गुन्हे दाखल
२) प्रसन्न ज्ञानेश्वर पवार, वय- २५ वर्षे, रा- मराठी शाळेजवळ, गोडुब्रे, ता-मावळ, जि. पुणे- **०४** गुन्हे दाखल

३) आकाश पडळघरे, रा- रिहे, ता-मुळशी, जि-पुणे- **१० गुन्हे ( पौंड पो. स्टे मोक्का केस मध्ये येरवडा कारागृहात)**
४) प्रकाश उर्फ पप्पु किसन मांडेकर, वय- २७ वर्षे रा- रा- मु.पो. आंबेठाण, ता-खेड, जि-पुणे- **०५** गुन्हे दाखल
५) ओंकार ऊर्फ अभिजीत बाजीराव ढमाले वय-२६ वर्षे रा. ढमाले चाळ, जुनी सांगवी- **१०** गुन्हे दाखल
**(यापुर्वी पुणे जिल्हयातुन तडीपार होता)**
६) संतोष राठोड, रा- तळेगाव दाभाडे- **०४** गुन्हे दाखल
७) तुषार महादु बावकर, वय- २५ वर्षे, रा- कासारसाई, ता- मुळशी, जि- पुणे- **०४** गुन्हे दाखल
**(यापुर्वी पुणे जिल्हयातुन तडीपार होता)**
८) शिवकुमार मुरगन ऊर्फ बल्ली रा- आंबेडकर नगर, देहुरोड
९) सिराज सलीम शेख, वय-३४ वर्षे, रा- मु.पो. आंबेठाण, ता-खेड, जि-पुणे

त्यापैकी कुश पवार, प्रसन्न पवार, प्रकाश मांडेकर, सिराज शेख, यांना अटक करुन त्यांचे कडुन **१८ पिस्टल/गावठी कट्टे व २२ जिवंत काडतुसे जप्त** करण्यात आली.

तसेच आरोपी नामे आकाश उर्फ बाळा जगन्नाथ वाघमोडे व योगेश विठ्ठल कांबळे, या टोळी प्रमुखाने मध्य प्रदेश येथुन **एकुण २७ पिस्टल/गावठी कट्टे** आणुन ते खालील आरोपींना विकल्याचे निष्पन्न झाले.
१) आकाश उर्फ बाळु जगन्नाथ वाघमोडे, वय- २५ वर्षे, रा- पटेल चौक, कुर्डुवाडी, सोलापुर-**०८** गुन्हे दाखल
२) योगेश विठ्ठल कांबळे, वय- २४ वर्षे, रा- मु. पो. शिराळा, ता-परांडा, जि- उस्मानाबाद-**०२** गुन्हे दाखल
३) अक्षय दिलीप केमकर, वय- २८ रा- मेडद, ता- माळशिरस, जि- सोलापुर-**०६** गुन्हे दाखल
४) योगेश ऊर्फ आबा बापुराव तावरे, वय- २४ वर्षे, रा-माळेगाव, ता- बारामती, जि- पुणे-**०३** गुन्हे दाखल
५) चेतन ऊर्फ मामा गोविंद लिमन, वय- २८ वर्षे रा- लिंबाची तालीम, ता- हवेली, जि- पुणे-**१०** गुन्हे दाखल
६) प्रज्ञेश संजय नेटके,रा- फ्लॉट नंबर- ०३, जयवंत भोर चेम्बर्स गावडे-भोर आळी, चिंचवडगाव-**०२** गुन्हे दाखल
७) मयुर अनिल घोलप, रा- फ्लॅट नंबर- १०, ई/२, बिबवेवाडी, पुणे-**०९** गुन्हे दाखल **(पुणे जिल्हयातुन तडीपार)**
८) विकी अनिल घोलप, रा- फ्लॅट नंबर- १०, ई/२, बिबवेवाडी, पुणे-**१०** गुन्हे दाखल **(पुणे जिल्हयातुन तडीपार)**
९) राजु भाळे, रा- इंदापुर-**०४** गुन्हे दाखल **(इंदापुर पो. ठाण्यातील भा.दं.वि. कलम ३०७ चे गुन्हयात फरार)**
१०) सोमनाथ ऊर्फ सोमा रमेश चव्हाण, रा- कालगाव, ता- कराड, जि- सातारा-**१३** गुन्हे दाखल **(सातारा जेल मध्ये)**

त्यांचे कडुन **०७ पिस्टल/गावठी कट्ट व ०७ जिवंत काडतुसे** तसेच शस्त्रे आणण्यासाठी वापरलेली **सेलोरो कार** जप्त करण्यात आली.

तसेच आरोपी नामे ग्यानोबा उर्फ गोटु मारुती गिते, रा- परळी, जि- बीड याचे कडुन यापुर्वी **०६पिस्टल/गावठी कट्ट व १५ जिवंत काडतुसे** जप्त करण्यात आले आहेत.

**एकुण २६ आरोपी निष्पन्न करुन त्यातील १५ आरोपी अटक करुन त्यांचे कडुन एकुण १९,८९,५००/- रुपये किंमतीचे ४२ पिस्टल/गावठी कट्टे व ६६ जिवंत काडतुसे व सेलोरो कार जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीवर यापुर्वी दाखल असलेल्या विविध केसेस मध्ये विविध पोलीस ठाण्यात १४ पिस्टल जमा असुन इतर आरोपी व बाकी शस्त्रांचा शोध सुरु आहे.**

सदर गुन्हयाचा तपास श्री अंबरिष देशमुख,सहायक पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा, युनिट- ४,पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.


॥ सत्यमेव जयते ॥
महाराष्ट्र पोलीस


Pimpri Chinchwad Police Commissionerate Celebrates